navbharat
Mega Developers

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
## 03 Apr, 2025

### Total Mention 26

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 6 | N/A | 1 | 5 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| 16 | N/A | N/A | N/A | 16 |

| Online |
|---|
| 4 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | Free Press Journal | HC seeks Centre, State response to Dharavi PIL | Mumbai | 2 |
| 2. | Dophar Ka Samana | Uproar over handing over Kurla's Mother Dairy plot to Adani | Mumbai | 6 |
| 3. | Nav Rashtra | Mithagaras place transferred to state | Mumbai | 1 |
| 4. | Punyanagari | Mithagaras place to state government | Mumbai | 5 |
| 5. | Loksatta | Mithagar land to be given to state for 'welfare' project | Mumbai | 1, 4 |
| 6. | Saamana | Mithagar lands are in the hands of builders! | Mumbai | 1, 2 |

Free Press Journal • 03 Apr • Dharavi

HC seeks Centre, State response to Dharavi PIL

| 2 • PG | 64 • Sqcm | 50559 • AVE | 251.68K • Cir | Bottom Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# HC seeks Centre, State response to Dharavi PIL

**Urvi Mahajani**
MUMBAI

The Bombay High Court has directed the Union and Maharashtra governments to file their replies to a Public Interest Litigation (PIL) challenging the state's decision to rehabilitate Dharavi residents on salt pan lands in Mulund. The PIL, filed by advocate Sagar Devre, argues that the plan will destroy the fragile coastal ecosystem, which has already suffered due to extensive reclamation projects across Mumbai.

A bench of Chief Justice Alok Aradhe and Justice MS Karnik granted the government four weeks to respond.

The PIL challenged two government resolutions — dated August 7 and September 30, 2024 — that approved the transfer of 255.9 acres of salt pan land from the Centre to the state for rehabilitation structures. It also challenges an August 23 Office Memorandum issued by the Ministry of Commerce and Industry's Department for Promotion of Industry and Internal Trade.

Dophar Ka Samana • 03 Apr • Dharavi

Uproar over handing over Kurla's Mother Dairy plot to Adani

| 6 • PG | 918 • Sqcm | 151478 • AVE | 198.08K • Cir | Middle Center |
| --- | --- | --- | --- | --- |

Mumbai

# कुर्ला का मदर डेयरी प्लॉट अडानी को सौंपने पर बवाल!

## प्लॉट सौंपने की पारदर्शिता पर उठे सवाल

- **पुनर्विकास या रियल स्टेट को फायदा पहुंचाने की कोशिश?**
- **सैकड़ों पेड़ों पर गहराया संकट**

**सामना संवाददाता / मुंबई**

मुंबई में धारावी पुनर्विकास परियोजना के तहत महाराष्ट्र सरकार ने कुर्ला स्थित १९ एकड़ का मदर डेयरी प्लॉट अडानी समूह की कंपनी नवभारत मेगा डेवलपर्स प्रा. लिमिटेड (एनएमडीपीएल) को सौंप दिया है। लेकिन यह प्रक्रिया कितनी पारदर्शी थी, इस पर सवाल उठ रहे हैं।

खबरों की मानें तो सरकारी दस्तावेजों के अनुसार, यह प्लॉट उन धारावी निवासियों के पुनर्वास के लिए उपयोग किया जाना है, जो धारावी में पुनर्वास के पात्र नहीं हैं। इसके अलावा, इसमें कुछ हिस्सा रियल एस्टेट बाजार में फ्री सेल के लिए भी रखा जाएगा। क्या यह सौदा पुनर्वास के नाम पर व्यावसायिक लाभ उठाने की कोशिश है?

इसके अलावा, इस परियोजना के लिए पर्यावरणीय मंजूरी (एसईआईएए) की भी आवश्यकता है, क्योंकि इस प्लॉट पर ९०० से अधिक पेड़ मौजूद हैं। स्थानीय संगठनों का कहना है कि यदि यहां निर्माण कार्य होता है तो सैकड़ों पेड़ काटे जाएंगे, जिससे पर्यावरण को नुकसान पहुंचेगा। सरकार को यह स्पष्ट करना होगा कि क्या पेड़ों की कटाई के लिए कोई ठोस मुआवजा योजना है।

एक और महत्वपूर्ण सवाल यह है कि क्या सरकारी प्लॉटों का सही उपयोग हो रहा है या इन्हें निजी कंपनियों को सौंपकर व्यावसायिक लाभ लिया जा रहा है। धारावी पुनर्विकास एक महत्वपूर्ण परियोजना है, लेकिन इसकी प्रक्रिया में पारदर्शिता और जवाबदेही सुनिश्चित करना भी जरूरी है।

Nav Rashtra • 03 Apr • Dharavi

## Mithagaras place transferred to state

| 1 • PG | 480 • Sqcm | 792439 • AVE | 500.5K • Cir | Top Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

### धारावी पुनर्विकास : केंद्राची हायकोर्टात माहिती

# मिठागरांची जागा राज्याला हस्तांतरित

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबईतील केंद्र सरकारच्या मालकीची मिठागरांच्या जमिनीपैकी काही भाग हा कल्याणकारी प्रकल्पांसाठी राज्य सरकारला हस्तांतरित करीत असल्याची माहिती केंद्र सरकारच्या वतीने बुधावारी उच्च न्यायालयात देण्यात आली.

धारावी पुनर्विकास प्रकल्पातील बाधितांचे मुलुंड येथील मिठागरांच्या जागेवर पुनर्वसन करण्याच्या निर्णयाला जनहित याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले आहे, त्या याचिकेवरील सुनावणीवेळी अतिरिक्त सॉलिसीटर जनरल अनिल सिंह यांनी केंद्र सरकारच्या वतीने ही माहिती न्यायालयाला दिली. तर धारावी पुनर्विकास प्रकल्पातील बाधितांच्या पुनर्वसनाचा निर्णय घेण्यापूर्वी राज्य सरकारने योग्य ते सर्वेक्षण केल्याची माहिती अतिरिक्त सरकारी वकील मिलिंद मोरे यांनी न्यायालयाला दिली. तसेच, केंद्र आणि राज्य सरकारने सविस्तर उत्तर दाखल करण्यासाठी वाढीव वेळ देण्याची विनंती न्यायालयाकडे केली. त्याची दखल घेऊन मुख्य न्या. आलोक आऱाधे आणि न्या. मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठाने केंद्र व राज्य सरकारची विनंती स्वीकारून याचिकेवर उत्तर दाखल करण्यासाठी चार आठवड्यांची मुदत दिली.



### घरांचे बांधकाम प्रस्तावित

राज्य मंत्रिमंडळाने गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी मिठागरांची जागा भाडेत्त्वावर हस्तांतरित करण्यास सांगितली. या जागेवर धारावी पुनर्वसन प्रकल्प व अन्य प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्यासह परवडणारी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्याचा प्रस्ताव आहे.

### 'त्या' निर्णयालाही दिले आव्हान

७ ऑगस्ट आणि ३० सप्टेंबर रोजीच्या दोन सरकारी ठरावांना आव्हान देण्यात आले आहे. या ठरावांद्वारे २५५.९ एकर मिठागरांची जागा प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी केंद्र सरकारकडून राज्य सरकारकडे हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली होती. या संदर्भातील वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापाराच्या संवर्धनासाठी काढलेल्या २३ ऑगस्ट रोजीच्या निर्णयाला देखील आव्हान देण्यात आले आहे.

**पर्यावरणाचा ऱ्हास होणार :** बॅक-बे, वांद्रे-कुर्ला संकुल, तुर्भे, मानखुर्द, वाशी, माहुल, शिवडी, मुलुंड यासारख्या भागात भराव टाकून विविध पुनर्वसन प्रकल्प राबवण्यात आले. परिणामी, या परिसरातील पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला होता. त्यामुळे, मिठागरांच्या जागा पुनर्वसन प्रकल्पांसाठी उपलब्ध करण्याचा सरकारच्या निर्णयाने पर्यावरणाचा आणखी ऱ्हास होईल, असा दावा धारावी पुनर्विकास प्रकल्पातील बाधितांचे मुलुंडमध्ये पुनर्वसन करण्याविरोधात वकील सागर देवरे यांनी वकील राज अवस्थी यांच्यामार्फत केलेल्या जनहित याचिकेतून करण्यात आला आहे.

### मिठागरांच्या जागांवर पुनर्वसन नको; 'वनशक्ती'ची याचिका

वनशक्ती या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या जनहित याचिकेवर १९ मार्च २०१४ रोजी निर्णय देताना उच्च न्यायालयाने पाणथळ जागा संरक्षित करण्याचे आदेश सरकारला दिले होते. २६ सप्टेंबर २०१७ रोजी केंद्र सरकारने आपल्या संवर्धन आणि व्यवस्थापनाच्या नियमांतील पाणथळ जागांच्या व्याख्येतून मिठागरांना वगळले. त्यानंतर, मार्च २०२२मध्ये पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने पाणथळ जागांचे संरक्षण करणारी अधिसूचना काढली. त्यानंतरही राज्य सरकारने धारावी पुनर्विकास प्रकल्पातील बाधितांच्या पुनर्वसनासाठी मिठागरांच्या जमिनी हस्तांतरित करण्याचा ठराव ७ ऑगस्ट रोजी केल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. सरकारच्या २३ ऑगस्ट रोजीच्या निर्णयानुसार मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध करण्यात आली. ही मार्गदर्शक तत्त्वे मज्जाव करणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणारी असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे.

The Central Government informed the High Court about transferring salt pan lands to the state for the Dharavi redevelopment project. The transfer, aimed at providing housing for economically weaker sections, is challenged due to environmental concerns. The court gave both governments four weeks to respond to the petition.

Punyanagari • 03 Apr • Dharavi

## Mithagaras place to state government

| 5 • PG | 197 • Sqcm | 108257 • AVE | 72.24K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# मिठागरांची जागा राज्य सरकारकडे

## धारावीकरांच्या पुनर्विकासाचे प्रकरण; केंद्र सरकारची उच्च न्यायालयात माहिती

**। मुंबई :** केंद्र सरकारच्या मालकीची मिठागरांच्या जमिनींपैकी काही भाग हा कल्याणकारी प्रकल्पांसाठी राज्य सरकारला हस्तांतरित करीत असल्याची माहिती केंद्र सरकारच्या वतीने बुधवारी उच्च न्यायालयात देण्यात आली.

धारावी पुनर्विकास प्रकल्पातील बाधितांचे मुलुंड येथील मिठागरांच्या जागेवर पुनर्वसन करण्याच्या निर्णयाला जनहित याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले आहे, त्या याचिकेवरील सुनावणीवेळी अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंह यांनी केंद्र सरकारच्या वतीने ही माहिती न्यायालयाला दिली. तर धारावी पुनर्विकास प्रकल्पातील बाधितांच्या पुनर्वसनाचा निर्णय घेण्यापूर्वी राज्य सरकारने योग्य ते सर्वेक्षण केल्याची माहिती अतिरिक्त सरकारी वकील मिलिंद मोरे यांनी न्यायालयाला दिली. तसेच, केंद्र आणि राज्य सरकारने सविस्तर उत्तर दाखल करण्यासाठी वाढीव वेळ देण्याची विनंती न्यायालयाकडे केली. त्याची दखल घेऊन मुख्य न्या. आलोक आराधे आणि न्या. मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठाने केंद्र व राज्य सरकारची विनंती स्वीकारून याचिकेवर उत्तर दाखल करण्यासाठी चार आठवड्यांची मुदत दिली. बॅक-बे, वांद्रे-कुर्ला संकुल, तुर्भे, मानखुर्द, वाशी, माहुल, शिवडी, मुलुंड यासारख्या भागांत भराव टाकून विविध पुनर्वसन प्रकल्प राबवण्यात आले.

परिणामी, या परिसरातील पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला होता. त्यामुळे, मिठागरांच्या जागा पुनर्वसन प्रकल्पांसाठी उपलब्ध करण्याचा सरकारच्या निर्णयाने पर्यावरणाचा आणखी ऱ्हास होईल, असा दावा धारावी पुनर्विकास प्रकल्पातील बाधितांचे मुलुंडमध्ये पुनर्वसन करण्याविरोधात वकील सागर देवरे यांनी वकील राज अवस्थी यांच्यामार्फत केलेल्या जनहित याचिकेतून करण्यात आला आहे. ७ ऑगस्ट आणि ३० सप्टेंबर रोजीच्या दोन सरकारी ठरावांना आव्हान देण्यात आले आहे. या ठरावांद्वारे २५५.९ एकर मिठागरांची जागा प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी केंद्र सरकारकडून राज्य सरकारकडे हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली होती.

### मिठागरांच्या जागांवर पुनर्वसन नको

वनशक्ती या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या जनहित याचिकेवर १९ मार्च २०१४ रोजी निर्णय देताना उच्च न्यायालयाने पाणथळ जागा संरक्षित करण्याचे आदेश सरकारला दिले होते. तथापि, २६ सप्टेंबर २०१७ रोजी केंद्र सरकारने आपल्या संवर्धन आणि व्यवस्थापनाच्या नियमांतील पाणथळ जागांच्या व्याख्येतून मिठागरांना वगळले. त्यानंतर, मार्च २०२२ मध्ये पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने पाणथळ जागांचे संरक्षण करणारी अधिसूचना काढली. त्यानंतरही राज्य सरकारने धारावी पुनर्विकास प्रकल्पातील बाधितांच्या पुनर्वसनासाठी मिठागरांच्या जमिनी हस्तांतरित करण्याचा ठराव ७ ऑगस्ट रोजी केल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. सरकारच्या २३ ऑगस्ट रोजीच्या निर्णयानुसार, मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध करण्यात आली. ही मार्गदर्शक तत्त्वे पाणथळ जागा संरक्षित करण्याच्या व तेथे कोणत्याही प्रकारच्या बांधकामास भराव टाकण्यास मज्जाव करणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणारी असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे.

The Central Government informed the High Court that it is transferring salt lands to the state for the Dharavi redevelopment project. Despite concerns raised by an NGO about environmental impact, the court granted more time for detailed responses. The transfer of 1.5 acres of land has been challenged for violating guidelines.

Loksatta • 03 Apr • Dharavi

Mithagar land to be given to state for 'welfare' project

| 1, 4 • PG | 227 • Sqcm | 889886 • AVE | 784.32K • Cir | Middle Center,Top Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# मिठागरांची जमीन 'कल्याणकारी' प्रकल्पासाठी राज्याकडे

## केंद्राची न्यायालयात भूमिका, धारावीकरांच्या पुनर्वसनासाठी सर्वेक्षण - राज्य सरकार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबईतील मिठागरांची जमीन केंद्र सरकारच्या मालकीची असून तिचा काही भाग हा 'कल्याणकारी प्रकल्पां'साठी राज्य सरकारला हस्तांतरित केल्याची भूमिका केंद्र सरकारने बुधवारी उच्च न्यायालयात मांडली. धारावीकरांचे पुनर्वसन या जागेवर करण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या जनहित याचिकेवरील सुनावणीदरम्यान या जागेचे सर्वेक्षण झाल्याची माहिती राज्य सरकारच्या वकिलांनी न्यायालयाला दिली.

केंद्र सरकारच्यावतीने अतिरिक्त न्यायअभिकर्ता अनिल सिंह यांनी न्यायालयात भूमिका मांडली. तर



धारावी पुनर्विकास प्रकल्पातील बाधितांच्या पुनर्वसनाचा निर्णय घेण्यापूर्वी राज्य सरकारने आवश्यक सर्वेक्षण केले आहे, अशी माहिती अतिरिक्त सरकारी वकील मिलिंद मोरे यांनी दिली. केंद्र आणि राज्य सरकारने याचिकेवर सविस्तर उत्तर दाखल करण्यासाठी वेळ देण्याची विनंतीही यावेळी न्यायालयाकडे केली. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठाने प्रकरण थोडक्यात ऐकल्यानंतर ही विनंती मान्य करत चार आठवड्यांची मुदत दिली. धारावीकरांचे मुलुंडमध्ये पुनर्वसन करण्याविरोधात मोहीम चालवणारे वकील सागर देवरे यांनी वकील राज अवस्थी *(पान ४ वर)*

### विरोध का?

'वनशक्त' या स्वयंसेवी संस्थेच्या जनहित याचिकेवर १९ मार्च २०१४ रोजी निर्णय देताना उच्च न्यायालयाने पाणथळ जागा संरक्षित करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले होते. तथापि, २६ सप्टेंबर २०१७ रोजी केंद्र सरकारने आपल्या संवर्धन आणि व्यवस्थापनाच्या नियमांतील पाणथळ जागांच्या व्याख्येतून मिठागरांना वगळले. त्यानंतर, मार्च २०२२मध्ये पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने पाणथळ जागांचे संरक्षण करण्यासाठी अधिसूचना काढली. परंतु, त्यानंतरही राज्य सरकारने परवडणाऱ्या घरांसाठी आणि धारावी पुनर्विकास प्रकल्पातील बाधितांच्या पुनर्वसनासाठी मिठागरांच्या जमिनी हस्तांतरित करण्याचा ठराव ७ ऑगस्ट रोजी केल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.

# मिठागरांची जमीन 'कल्याणकारी' प्रकल्पासाठी राज्याकडे

*(पान १ वरून)* यांच्यामार्फत ही जनहित याचिका केली आहे. बॅक-बे, वांद्रे-कुर्ला संकुल, तुर्भे, मानखुर्द, वाशी, माहुल, शिवडी, मुलुंड यासारख्या भागात भराव टाकून विविध पुनर्वसन प्रकल्प राबवण्यात आले. परिणामी, या परिसरातील पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला होता. त्यामुळे, मिठागरांच्या जागा पुनर्वसन प्रकल्पांसाठी उपलब्ध करण्याचा सरकारच्या निर्णयाने पर्यावरणाचा आणखी ऱ्हास होईल, असा दावा याचिकेत करण्यात आला आहे. याचिकेत ७ ऑगस्ट आणि ३० सप्टेंबर रोजीच्या दोन सरकारी ठरावांना आव्हान देण्यात आले आहे. दरम्यान, राज्य मंत्रिमंडळाने गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी मिठागरांची जागा भाडेत्त्वावर हस्तांतरित करण्यास सांगितले आहे. या जागेवर धारावी पुनर्वसन प्रकल्प व अन्य प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्यासह परवडणारी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्याचा प्रस्ताव आहे.

The Central Government proposed transferring land in Mithagar, Mumbai, to the state for welfare projects, including the Dharavi redevelopment. State government lawyers opposed a survey during a public interest petition hearing. The court granted four weeks for detailed responses, with concerns raised about environmental impacts from the land transfer.

Saamana • 03 Apr • Dharavi

## Mithagar lands are in the hands of builders!

| 1, 2 • PG | 795 • Sqcm | 472330 • AVE | 910K • Cir | Middle Center,Top Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

**आतील पानांत**

# मिठागरांच्या जमिनी बिल्डरांच्या घशात

## चार आठवड्यांत उत्तर सादर करा हायकोर्टाचे केंद्र व राज्याला आदेश



धारावी पुनर्वसनाच्या नावाखाली अदानी समूहाला मिठागरांच्या जमिनी आंदण दिल्या जात आहेत. याविरोधात याचिका दाखल केली आहे.

पान २

# मिठागरांच्या जमिनी बिल्डरांच्या घशात!

## चार आठवड्यांत उत्तर सादर करा; हायकोर्टाचे केंद्र, राज्य सरकारला आदेश

मुंबई, दि. २ (प्रतिनिधी) – धारावी पुनर्वसनाच्या नावाखाली अदानीला मिठागरांच्या जमिनी आंदण दिल्या जात आहेत. सरकारचा हा निर्णय अन्यायकारक असून तो रद्द करावा, अशी मागणी करणारी याचिका हायकोर्टात दाखल केली आहे. या याचिकेची मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठाने दखल घेत केंद्र व राज्य सरकारला चार आठवड्यांत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

मिठागरांच्या जमीन धारावी पुनर्वसन प्रकल्प, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन तसेच परवडणाऱ्या घरांच्या प्रकल्पांसाठी अदानी समूहाच्या खासगी विकासकांना देण्याचा निर्णय सरकारने घेतला. केंद्र सरकारने मिठागरांच्या जमिनी राज्य सरकारकडे हस्तांतरित केल्या आणि या जमिनींवर दुर्बल घटकांसाठी घरांच्या योजना राबवण्यास मुभा दिली. त्यानुसार केंद्राच्या ताब्यातील कांजूर येथील १२०.५ एकर, कांजूर व भांडुप येथील ७६.९ एकर आणि मुलुंड येथील ५८.५ एकर अशी एकूण २५५.९ एकर मिठागरांची जमीन राज्य सरकारकडे हस्तांतरित करण्यात येणार आहे. विकासकांच्या फायद्यासाठी सरकार मिठागरांच्या जमिनीवर अतिक्रमण करून पर्यावरणाचे नुकसान करत आहेत, असा दावा करत मुलुंड येथील ॲड. सागर देवरे यांनी ही जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर आज बुधवारी मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठासमोर सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल अनिल सिंह यांनी उत्तर दाखल करण्यासाठी खंडपीठाकडे वेळ मागितला.

The High Court has directed the Central and State Governments to respond within four weeks regarding the transfer of Mithagar land to Adani Group for Dharavi's rehabilitation. The petition, filed by Sagar Devere, claims the transfer of salt land for development is environmentally damaging. The case is being heard by Chief Justice Alok Aradh.

# Channel Overview

## Business Channel

No Coverage in this segment

## Hindi Channel

No Coverage in this segment

## English Channel

No Coverage in this segment

# Channel Overview

## Regional & Others Channel

| Total Clip | Top Channel |
|---|---|
| **16** | **ABP Majha (4)** |

| | | |
|---|---|---|
| 1. | ABP Majha | 4 |
| 2. | Zee 24 Taas | 4 |
| 3. | Jai Maharashtra | 3 |
| 4. | News18 Lokmat | 3 |
| 5. | Lokshahi Marathi | 1 |
| 6. | TV9 Marathi | 1 |

**Jai Maharashtra**
**Dharavi**




Shiv Sena leader Sanjay Raut target BJP on Waqf Bill said Just as Dharavi's land and Mumbai airport's land have been given, W...

News • Marathi • 12:19 PM 03 Apr, 2025

**ABP Majha**
**Dharavi**




Shiv Sena leader Sanjay Raut target BJP on Waqf Bill said Just as Dharavi's land and Mumbai airport's land have been given, W...

Special • Marathi • 11:31 AM 03 Apr, 2025

**Jai Maharashtra**
**Dharavi**




Shiv Sena leader Sanjay Raut target BJP on Waqf Bill said Just as Dharavi's land and Mumbai airport's land have been given, W...

News • Marathi • 11:11 AM 03 Apr, 2025

**ABP Majha**
**Dharavi**




Shiv Sena leader Sanjay Raut target BJP on Waqf Bill said Just as Dharavi's land and Mumbai airport's land have been given, W...

Special • Marathi • 10:31 AM 03 Apr, 2025

**ABP Majha**
**Dharavi**




Shiv Sena leader Sanjay Raut target BJP on Waqf Bill said Just as Dharavi's land and Mumbai airport's land have been given, W...

Special • Marathi • 09:59 AM 03 Apr, 2025

**Lokshahi Marathi**
**Dharavi**




LIVE: Shiv Sena leader Sanjay Raut addressing a press conference, target BJP on Waqf Bill says Just as Dharavi's land and Mum...

Live • Marathi • 09:38 AM 03 Apr, 2025

**ABP Majha**
**Dharavi**




LIVE: Shiv Sena leader Sanjay Raut addressing a press conference, target BJP on Waqf Bill says Just as Dharavi's land and Mum...

Live • Marathi • 09:37 AM 03 Apr, 2025

**TV9 Marathi**
**Dharavi**




LIVE: Shiv Sena leader Sanjay Raut addressing a press conference, target BJP on Waqf Bill says Just as Dharavi's land and Mum...

Live • Marathi • 09:37 AM 03 Apr, 2025

**Zee 24 Taas**
**Dharavi**




LIVE: Shiv Sena leader Sanjay Raut addressing a press conference, target BJP on Waqf Bill says Just as Dharavi's land and Mum...

Live • Marathi • 09:37 AM 03 Apr, 2025

**Jai Maharashtra**
**Dharavi**




LIVE: Shiv Sena leader Sanjay Raut addressing a press conference, target BJP on Waqf Bill says Just as Dharavi's land and Mum...

Live • Marathi • 09:37 AM 03 Apr, 2025

**Zee 24 Taas**
**Dharavi**




Dharavi Redevelopment: The land of Mithagar in Mumbai is owned by the central government and some of that land has been trans...

24 Tass Superfast • Marathi • 08:34 AM 03 Apr, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




Mithagar's land belongs to the Centre, Centre's role in the court

Gavakadchya 50 Batmya • Marathi • 08:25 AM 03 Apr, 2025

**Zee 24 Taas**
**Dharavi**




Dharavi Redevelopment: The land of Mithagar in Mumbai is owned by the central government and some of that land has been trans...

24 Tass Superfast • Marathi • 08:11 AM 03 Apr, 2025

**Zee 24 Taas**
**Dharavi**




Dharavi Redevelopment: The land of Mithagar in Mumbai is owned by the central government and some of that land has been trans...

Zatpat Batmya • Marathi • 07:34 AM 03 Apr, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




Dharavi Redevelopment Issue: The stand of the Central Government in the High Court was that the land of the Mithagar in Mumba...

Gavakadchya 50 Batmya • Marathi • 07:32 AM 03 Apr, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




Dharavi Redevelopment Issue: The stand of the Central Government in the High Court was that the land of the Mithagar in Mumba...

Sakalchya 100 Batmya • Marathi • 07:03 AM 03 Apr, 2025

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | Manorama Online | ‘ഭൂമി വഖഫ് ബോ ഡും പിന്നീട് കോ ഗ്രസും കയ്യടക്കി; ബി അവതരിപ്പിച്ചത് ഈ കൊള്ള തടയാ ... | 37.6M |
| 2. | Loksatta - Marathi Newspaper | धारावीकरांच्या पुनर्विकासाचा मुद्दा; कल्याणकारी प्रकल्पासाठी मिठागरांची जागा राज... | 33.4M |
| 3. | The Economic Times | Sudhir Mishra, Chameli filmmaker, questions popularity of Netflix"s Adolescence... | 28.7M |
| 4. | Free Press Journal | Bombay HC Seeks Centre, State"s Reply On PIL Against Dharavi PAP Rehabilitation... | 6.4M |